# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेत `ओपन डे ` चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रशाळेतील परिक्षार्थी विद्यार्थ्यांना त्यांच्या तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका थेट हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अभिनव कल्पनेतून गेल्या दोन वर्षांपासून थेट उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करणारा ओपन डे हा प्रयोग विविध प्रशाळांमध्ये राबविण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. रसायनशास्त्र प्रशाळेत एम.एस्सी. (प्रथम) वर्गातील नियमित व रिपीटर विद्यार्थ्यांसाठी फिजिकल केमिस्ट्री, ऑर्गेनिक केमिस्ट्री, इन-ऑर्गेनिक केमिस्ट्री या विषयाच्या तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी ओपन डे चे आयोजन करण्यात आले होते. एकूण ११५ विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका त्यांच्या हातात देवून संबंधित विषयाच्या परीक्षकांकडून शंकांचे निरसन करण्यात आले. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, प्रशाळेचे संचालक डी.एच.मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.रत्नमाला बेंद्रे, डॉ.डी.एस.दलाल, डॉ.व्ही.व्ही.गिते, प्रा.ए.एम.पाटील आदी उपस्थित होते.

---

**बातमी क्र.२**

जळगाव.१९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षेत बी.एस्सी. भूगोल मुख्य विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला आणि बी.ए.इंग्रजी मुख्य विषयात विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस सुवर्णपदक स्थापित करण्यासाठी प्रा.वसंत नारखेडे यांनी बुधवारी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे चार लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

प्रा.नारखेडे यांनी ही दोन सुवर्णपदके प्रायोजित केली आहेत. बी.एस्सी भूगोल विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला प्रा.वसंत चिंधू नारखेडे सुवर्णपदक तर बी.ए. इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला प्रतिभा वसंत नारखेडे सुवर्णपदक दिले जाणार आहे. या सुवर्णपदकासाठी चार लाख रुपयांचा धनादेश प्रा.नारखेडे यांनी कुलगुरुंकडे सुपूर्द केला. ही दोन्ही सुवर्णपदकेप्रदान करताना दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींचा प्राधान्याने विचार व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, प्रा.अमुलराव बोरसे, अविनाश भोळे हे उपस्थित होते.

---

जा.क्र: उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : १९ डिसेंबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी